**कृपया प्रसिद्धीसाठी** **8 ऑगस्ट 2013**

## मच्छिमारांच्या प्रश्नात कृषिमंत्री शरद पवार लक्ष घालणारः राम नाईक

**मुंबई,गुरुवारः** ''मच्छिमारांना नाकारण्यात आलेला डिझेलवरील प्रतिलिटर रु. तीनचा परतावा सुरु करण्याचा तसेच शेतक-यांच्याप्रमाणेच मच्छिमारांनाही चार टक्के व्याजाने कर्ज देण्याचा आणि समुद्रातील आर्थिक क्षेत्रामधील कायदा आणि व्यवस्था राखण्यासाठी योग्य तो नवा कायदा करण्याचा प्रयत्न करण्यात येईल'' असे आश्वासन कृषिमंत्री श्री. शरद पवार यांनी भारतीय जनता पार्टीचे नेते श्री.राम नाईक यांना बुधवारी दिल्ली येथे झालेल्या चर्चेच्या वेळी दिले. ही माहिती श्री. नाईक यांच्या जनसंपर्क कार्यालयातून प्रसिद्ध केलेल्या पत्रकात देण्यात आली आहे.

चर्चेसंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,''मच्छिमारांच्या वरील मागण्यांसंबंधी मच्छिमारांची वेळोवेळी आंदोलने झाली तसेच चर्चाही झाल्या परंतु त्या मागण्यांची तड लागली नाही. मच्छिमारांना डिझेलच्या परताव्याचा दर वाजपेयी सरकारच्या काळात प्रतिलिटर 35 पैश्यावरुन रु. 1.50 करण्यात आला. डिझेलच्या वाढलेल्या किंमतीमुळे परतावा रु. चार प्रतिलिटर करण्याची मागणी होती, तिला प्रतिसाद म्हणून रु. तीन परतावा देण्याचा निर्णय मनमोहन सिंह सरकारने केला परंतु त्यामध्ये हा परतावा गरीबीरेषेखालील मच्छिमारानांच दिला जाईल अशी अट घालण्यात आली. मच्छिमारांच्या यांत्रिक बोटीची किंमत रु.10-15 लाख असते त्यामुळे बोटीचा मालक गरीबी रेषेखालचा असूच शकत नाही. परिणामी गेल्या तीन वर्षात एकाही मच्छिमाराला परतावा मिळू शकला नाही. चर्चेच्या वेळी हजर असलेले कृषिमंत्रालयाचे संयुक्त सचिव श्री. राज शेखर यांनी हे मान्य केले. त्यामुळे परताव्याच्या अटीचा नियम बदलून घेण्यात येईल असे आश्वासन कृषिमंत्र्यांनी दिले.''

''शेतक-यांना शेतीसाठी चार टक्के व्याजाने कर्ज दिले जाते. मासेमारी ही समुद्रावरील शेती मानली जाते. त्यामुळे मच्छिमारांनाही या सवलतीचा फायदा मिळाला पाहिजे. मागणीला अनुसरुन पूर्वी चर्चा झालेली होती परंतु अद्याप निर्णय झाला नाही, याकडे कृषिमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले असता त्यांनी अग्रक्रमाने अर्थमंत्र्यांशी चर्चा करुन ही सवलत देण्यात येईल असे आश्वासन दिले'', असेही श्री. राम नाईक यांनी सांगितले.

''याशिवाय बारा सागरी मैलांच्या पलिकडील समुद्रात विशेष आर्थिक क्षेत्र - एक्स्लुझिव्ह इकॉनॉमिक झोन (इझेड) मध्ये निर्माण होणारे कायदा आणि व्यवस्थेचे गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी कायदा बनविण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली होती. याप्रकरणी 17 मार्च 2009 रोजी असा कायदा करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे असे कृषि मंत्रालयाने सांगितल्यास चार वर्षे उलटली तरही अद्याप कायदा झाला नाही, हेही कृषि मंत्री श्री. शरद पवार यांच्या निदर्शनास यावेळी आणून देण्यात आले. कायदा बनविण्याचे काम विधि मंत्रालयाचे आहे. तथापि, विधि मंत्री श्री. कपिल सिब्बल यांना सांगून त्या प्रक्रियेला गती देण्याचा मी प्रयत्न करीन असेही आश्वासन श्री. शरद पवार यांनी दिले आहे.'' अशी माहिती श्री. नाईक यांनी पत्रकाच्या शेवटी दिली आहे.

**(कार्यालय सचिव)**